**श्री. क्षेत्र पंढरपूर येथे वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विठ्ठल रखुमाई वारकरी योजना-२०२६ राबविण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२३/प्र.क्र.१३२/म-३**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०००३२**
**दिनांक: १० जुलै, २०२६**

**वाचा:**

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-२०२३/प्र.क्र.१३२ /म-३, दि. ०१.०७.२०२५

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाच्या पंढरपूर येथील वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरिता, आषाढी वारी-२०२६ दरम्यान (वारी सुरु झाल्याच्या दिनांकापासून ते वारी समाप्त होण्याच्या दिनांकापर्यन्त) नैसर्गिक मृत्यू व्यतिरिक्त तसेच आत्महत्या, विषबाधा, खून वगळून केवळ अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या अथवा जखमी झालेल्या वारक-यांसाठी, नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झाल्यास मृत व्यक्तीच्या निकटच्या वारसदारास तसेच, अपंगत्व, इस्पितळाचा खर्च या बाबींसाठी देण्यात येणाऱ्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२३ मदतीप्रमाणे आर्थिक मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

आषाढी वारी-२०२६ दरम्यान (वारी सुरु झाल्याच्या दिनांकापासून ते वारी समाप्त होण्याच्या दिनांकापर्यन्त- ( दिनांक ०७ जुलै ते २५ जुलै, २०२६ कालावधीत) अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या अथवा जखमी झालेल्या वारक-यांसाठी शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२३ मधील तरतुदीनुसार मदत देय राहील. मदतीचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारांस | रु.४.०० लाख |
| २) | वारी दरम्यान अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना | |
| | ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास | रु.७४,०००/- |
| | ६० टक्क्याहून अधिक अपंगत्व आल्यास | रु.२.५० लक्ष |
| ३) | एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी इस्पीतळात दाखल झाल्यास | रु.१६,०००/- |
| ४) | एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीकरिता दाखल झाल्यास | रु.५,४००/- |

२. प्रस्तुत योजना आषाढी वारी- २०२६ करिता श्री क्षेत्र पंढरपूर येथे पायी अथवा खाजगी / सार्वजनिक वाहनाने जाणाऱ्या वारकऱ्यांकरिता लागू राहील. तसेच संबंधित वारकरी आषाढी वारी २०२६ करिता श्री क्षेत्र पंढरपूर येथे गेल्याबाबतचे संबंधित तहसिलदार यांचे प्रमाणपत्र दाव्याच्या अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. सर्व तहसिलदार यांनी संबंधित वारकरी आषाढी वारी-२०२६ करिता गेल्याची खात्री करुन तशा स्वरुपाचे प्रमाणपत्र मागणीनुसार संबंधित वारकरी अथवा त्याचे वारसदार यांना निर्गमित करावे.

३. याकरिता संबंधित वारकरी / यांच्या वारसाने जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक राहील. राज्य शासनाकडून याकरिता देण्यात येणारी मदत संबंधितांना मंजूर करुन वितरीत करण्याकरिता जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सर्व जिल्हाधिकारी यांनी या योजनेंतर्गत सानुग्रह अनुदानाची मागणी करण्याचा अर्ज आल्यास, तहसिलदार यांचे प्रमाणपत्र, मृत्यू / वैद्यकीय प्रमाणपत्र पडताळणी करून आपतीग्रस्त वारकऱ्यांना वारी कालावधीत झालेल्या अपघाताची व्याप्ती लक्षात घेऊन प्रकरण निहाय परिच्छेद क्र. १ मधील सानुग्रह अनुदान मंजूर करुन वितरीत करावे.

४. संबंधीत जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त प्रयोजनाकरीता निधी मागणी प्रस्ताव महसूल व वन विभागाच्या कार्यासन म-११ कडे करावी.

५. प्रस्तुत प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र.६, मुख्य लेखाशिर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०२, पूर, चक्रीवादळे इ., १०१, सानुग्रह अर्थसहाय्य, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांव्यतिरिक्त खर्च, (९२) (०१) रोख भत्ता, मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत (अनिवार्य), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ २१९४) या लेखाशिर्षाखाली आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये उपलब्ध असलेल्या निधीमधून / पुर्नविनियोजनाद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीमधून करण्यात यावा.

६. आषाढी वारी-२०२६ दरम्यान (वारी सुरु झाल्याच्या दिनांकापासून ते वारी समाप्त होण्याच्या दिनांकापर्यन्त- (दिनांक ०७ जुलै ते २५ जुलै, २०२६) या कालावधी समाप्तीनंतर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील मदतीचा अहवाल व तपशील शासनास दिनांक ३०.०७.२०२६ पर्यंत सादर करावा.

७. हे आदेश वित्त विभागाच्या दिनांक ०७/०७/२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०७१३१२२११०९८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SURYAWANSHI
SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC0887C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D73112565DB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2026.07.13 15:13:37 +05'30'

**(संपत सूर्यवंशी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई

५. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासनिक विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व विभागीय आयुक्त.
४. सर्व जिल्हाधिकारी.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
६. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, बृहन्मुंबई.
९. वित्तिय सल्लागार व सहसचिव मदत व पुनर्वसन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
१०.कार्यासन अधिकारी (आव्यप्र-१, म-११/ब-१), मदत व पुनर्वसन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
११.वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई
१२.निवड नस्ती (कार्यासन/ म-३).